दिनांक २३/०३/२०२२

# प्रेस नोट

**आरोपी लोकसेवक संजीव गोपाळराव माडीबोयणे, वय ४५ वर्षे, पद– ग्रामसेवक, वर्ग ३, नेमणुक– ग्रामपंचायत कार्यालय, मौजे कन्हेरी, ता. औसा, जि. लातुर यांनी लाचेची मागणी करून लाच स्विकारल्यावरून रंगेहात पकडल्याने गुन्हा.**

यातील आरोपी लोकसेवक संजीव गोपाळराव माडीबोयणे, ग्रामसेवक यांनी तक्रारदार यांना त्यांचे वडील नामे गौतम पांडुरंग बोडके यांचे नावे मंजुर असलेल्या विहीरीच्या बिल मंजुरीसाठी लागणारे मजुराचे मस्टरवर सही करून देण्याच्या कामासाठी ५०००/– रूपये लाचेची मागणी केली बाबतची तक्रार दिनांक २१/०३/२०२२ रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, लातुर या कार्यालयाकडे प्राप्त झाली होती.

तक्रारदार यांचे तक्रारीच्या अनुषंगाने लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, लातूर यांच्या कडून दिनांक २३/०३/२०२२ रोजी लाचेच्या मागणीची पडताळणी केली असता, तक्रारदार यांना त्यांचे वडील नामे गौतम पांडुरंग बोडके यांचे नावे मंजुर असलेल्या विहीरीच्या बिल मंजुरीसाठी लागणारे मजुराचे मस्टरवर सही करून देण्याच्या कामासाठी ५०००/– रूपये लाचेची मागणी केल्याचे लाच पडताळणी दरम्यान निष्पन्न झाले.

तक्रारदार यांनी उपलब्ध करून दिलेली ५०००/– रूपये रक्कम आज दिनांक २३/०३/२०२२ रोजी आलोसे संजीव गोपाळराव माडीबोयणे, ग्रामसेवक यांनी लाच मागणी केलेली लाचेची रक्कम त्यांना देण्याकरीता तक्रारदार हे आरोपी लोकसेवक संजीव गोपाळराव माडीबोयणे, ग्रामसेवक यांच्याकडे मिनार हॉटेल, हाश्मी चौक, लातुर रोड, औसा, येथे गेले असता आरोपी लोकसेवक संजीव गोपाळराव माडीबोयणे ग्रामसेवक यांनी ५,०००/– रूपये लाचेची रक्कम पंचासमक्ष स्वत: स्विकारली त्यावेळी त्यांना रंगेहात पकडण्यात आले.

म्हणून तक्रारदार यांचे फिर्यादीवरून आरोपी लोकसेवक यांच्या विरुध्द पोलीस स्टेशन औसा, ता.औसा, जि. लातुर येथे कलम ७ ला.प्र.का. अधिनियम १९८८ अन्वये गुन्हा दाखल करण्यात येत आहे.

गुन्हयाचा तपास पोलीस निरीक्षक भास्कर पुल्ली, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, लातूर हे करीत आहेत.

सदरची सापळा कार्यवाही डॉ. राहुल खाडे, पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, औरंगाबाद परिक्षेत्र, औरंगाबाद, अतिरिक्त कार्यभार पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड परिक्षेत्र, नांदेड. धरमसिंग चव्हाण, अपर पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड परिक्षेत्र, नांदेड यांचे मार्गदर्शनानुसार पोलीस उप अधीक्षक पंडीत रेजितवाड, पोलीस निरीक्षक भास्कर पुल्ली, सफौ/ संजय पस्तापुरे, पोह/ रमाकांत चाटे, फारूख दामटे, भागवत कटारे, पोना/संतोष गिरी, पोका/ शिवशंकर कच्छवे, आशिष क्षिरसागर, संदीप जाधव, दिपक कलवले, मंगेश कोंडरे, मपोशि रुपाली भोसले, चापोना/राजु महाजन यांनी पार पाडली आहे.

तरी सर्व नागरीकांना आवाहन करण्यात येते की, शासकीय अधिकारी/कर्मचारी हे शासकीय काम करण्यासाठी लाचेची मागणी करीत असल्यास तसेच त्यांचे लाचेच्या मागणी संदर्भात खालील क्रमांकावर संपर्क करावा.

| | | |
|---|---|---|
| १) धरमसिंग चव्हाण, अपर पोलीस अधीक्षक | :– | मोबाईल क्रमांक ९९२३४९७०७६ |
| २) पंडीत रेजितवाड, पोलीस उप अधीक्षक | :– | मोबाईल क्रमांक ९३०९३४८१८४ |
| ३) टोल फ्री हेल्पलाईन क्रमांक | :– | १०६४ |
| ४) कार्यालयाचा फोन क्रमांक | :– | ०२४८२–२४२६७४ |
| ५) Website | :– | www.acbmaharashtra.gov.in |
| ६) Mobile App | :– | www.acbmaharashtra.net |
| ७) Facebook Page | :– | www.facebook.com/MaharashtraACB |

पोलीस उप अधीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, लातूर

Scanned with CamScanner